**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : जे. जी. दाते,
वय : ४० वर्षे,
व्यवसाय : जवान नं.५०, राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक क्र.३, तळेगाव दाभाडे, पुणे.
राहणार : तळेगाव, जि. पुणे.

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके</u>**

१. सन २०२४ मध्ये माझी नेमणुक जवान म्हणुन राज्य उत्पादन शुल्क, नारायणगाव विभाग बिट क्र. २ येथे होती.

२. दि.२०/०३/२०२४ रोजी मी व आमचे अधिकारी एस. ए. गायकवाड निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात असतांना साहेबांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, लोणी धामणी गावच्या हद्दीमध्ये लोणी पाबळ रोडच्या डाव्याबाजुस पत्र्याच्या शेडमध्ये अवैध रित्या ताडीची विक्री चालु आहे. त्यानंतर साहेबांनी दोन पंचाना ऑफिसमध्ये बोलावून घेतले. साहेबांनी पंचाना बातमीचा आशय समजावुन सांगितला व सोबत येऊन आक्षेपार्ह काही आढळुन आल्यास त्याचा पंचनामा करुन देण्यास विनंती केली. पंचानी त्याला सहमती दर्शविल्यानंतर मी साहेब, इतर अधिकारी, स्टाफ व दोन पंच असे सर्वजण मिळुन आवश्यक साहित्य व लॅपटॉप घेऊन सरकारी वाहनाने घटनास्थळी गेलो.

३. घटनास्थळाच्या थोडया अलीकडे वाहन थांबविले. वाहनातुन खाली उतरलो. त्यानंतर आम्ही पायी चालत जाऊन बातमी असलेल्या ठिकाणी पत्र्याच्या शेडमध्ये छापा मारला. तेथे एक इसम हजर होता. तो आम्हाला पाहुन पळून जाऊ लागला असतांना आम्ही

त्याला जागीच पकडले. साहेबांनी त्याला स्वतःचा व इतर स्टाफचा परीचय करुन दिला व येण्याचा उद्देश सांगितला. त्यानंतर त्याला सोबत घेऊन पत्र्याच्या शेडची तपासणी केली. तेथे ३५ लीटर क्षमतेचे एक प्लास्टिक कॅन व ५०० मि.ली. क्षमतेच्या ४८ प्लास्टिक पिशव्या द्रव पदार्थाने भरलेल्या दिसुन आल्या. साहेबांनी त्यातील द्रव पदार्थाची पाहणी केली असता त्याचा ताडीसारखा आंबट गोड वास आला. सदर पदार्थाबाबत इसमास विचारणा केली असता त्याने तो पदार्थ ताडी असल्याचे कबुल करुन तो विक्री करीता जवळ बाळगला असे सांगितले.

४. त्यास इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव परेश प्रकाश शहा, वय ४४ वर्ष, रा. लोणी धामणी, ता. आंबेगाव, जि. पुणे असे सांगितले. त्याला ताडी विक्रीबाबत परवाना असल्याचे विचारले असता त्याने परवाना नाही असे सांगितले. साहेबांनी त्याच्याविरुध्द गुन्हा नोंद केला. जप्त मुद्देमालापैकी १८० मि.ली. चा ताडीचा नमुना बाजुला काढून उर्वरीत ताडी वाहतुकीस योग्य नसल्याने व नाशवंत असल्याने ती जागीच नष्ट केली. त्यानंतर मी त्याच्याविरुध्द लेखी फिर्याद दाखल केली.

५. आता मला दि.२०/०३/२०२४ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.१०** देण्यात येतो. आता मला दि.२०/०३/२०२४ रोजीची छापिल फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.११** देण्यात येतो. मी आरोपीस ओळखतो . आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास : आरोपी पक्षातर्फे वकील श्री. एन. आर. निघोट यांच्यामार्फत**

६. आजपर्यंत मी अंदाजे १०० ते २०० केसेसमध्ये फिर्यादी म्हणुन फिर्याद दाखल केली आहे. आम्ही बातमीप्रमाणे छापा कारवाई करुन फिर्याद दाखल करतो. मी कोणत्या गुप्त बातमीदारामार्फत साहेबांना बातमी मिळाली हे विचारले नाही. लोणी धामणी गावची भौगोलिक हद्द साधारण अर्धा ते एक किलोमीटर आहे. लोणी धामणी गावच्या हद्दीमध्ये लोणी पाबळ रोड

साधारण ४०० ते  ५०० मीटर आहे. सदर ४०० ते ५०० मीटर अंतरामध्ये साधारण १० ते २० पत्राशेड असतील. आम्ही कोणत्या पत्राशेडमध्ये छापा टाकला होता त्याचा नंबर मला सांगता येणार नाही. सदर घटनास्थळाच्या चर्तुसिमा मला सांगता येणार नाही. मी त्या दिवशी सकाळी १०.३० वाजता ऑफीस गेलो होतो. मी त्या दिवशी कामावर आलो होतो याबाबत हजेरी पुस्तकात सही केली होती. मी सदर हजेरी पुस्तकाची फोटोकॉपी, तपास अधिका-याला दिली नव्हती.

७. आमच्याकडे स्टेशन डायरी असते. हे म्हणणे खरे आहे की, कारवाईसाठी बाहेर जायचे असल्यास त्याची नोंद स्टेशन डायरीला करणे आवश्यक आहे. त्या दिवशी आम्ही छापा कारवाईला गेलो होतो याची नोंद मी केली नव्हती. आम्ही छापा कारवाईकरीता सरकारी वाहनाने गेलो होते. सदर वाहनाचा नंबर व चालकाचे नाव मला सांगता येणार नाही. सदर वाहनाची नोंद लॉग बुकला केली होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. छापा कारवाईसाठी कोण कोण गेले होते त्यांची नावे मला आता सांगता येणार नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, नारायणगाव वरुन लोणी पाबळला जातांना अवसरी खुर्द व बोटा या गावावरुन जावे लागत नाही. मी पंच अनिकेत बोत्रे त्याला व्यक्तीशः ओळखतो. अनिकेत बोत्रे हा सदर केस सोडुन दुस-या कोणत्याही केसमध्ये पंच म्हणुन उपस्थित नाही. मी आरोपीविरुध्द फिर्याद कार्यालयात येऊन दिली. साहेबांनी घटनास्थळी आरोपीची माहिती विचारली, त्याचे फोटो काढले, चेहरेपट्टी घेतली, घटनास्थळ पंचनामा केला व मुद्देमालाचा नमुना काढुन घेतला, इ. कार्य केले. साहेबांकडे स्वतःचा खाजगी लॅपटॉप होता. साहेबांनी प्रिंट कुठे काढल्या हे मला सांगता येणार नाही. मी त्या दिवशी संपुर्ण दिवस साहेबांसोबत होतो. मुद्देमाल ज्या कॅनमध्ये सापडला तो कॅन कोणत्या कंपनीचा होता किंवा त्याच्यावर कोणती विशिष्ठ खुण होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सापडलेला द्रव पदार्थ हा ताडीच आहे हे रासायनिक विश्लेषकच सांगु शकतो. मी त्यातील तज्ञ नाही.

९. कोणताही प्रोहिबिशनचा मुद्देमाल न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय नष्ट करता येतो किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी कोणतेही प्लास्टिक कॅन मिळाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्लास्टिकचे कॅन आजरोजी

न्यायालयात हजर नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्लास्टिकचे कॅन नाशवंत नाही. सदर मुद्देमाल मी व इतर जवानांनी मिळुन नष्ट केला. मुद्देमाल नाश करण्याबाबत अम्हाला साहेबांचा लेखी स्वरुपात आदेश नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये छापा कारवाईसाठी किती वाजता निघालो, तसेच कारवाई किती वेळ चालली व किती वाजता परता आलो हे नमुद करणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाबी फिर्यादीमध्ये नमुद नाही.

प्रश्न - फिर्यादीमध्ये छापा कारवाई ज्या ठिकाणी केली त्या ठिकाणाच्या चर्तुसिमा लिहिने बंधनकार आहे का ?

उत्तर - सदर ठिकाणाच्या चर्तुसिमा माझ्या फिर्यादीत नमुद नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी अशा प्रकारची कोणतीही छापा कारवाई झाले नाही त्यामुळे सदर कारवाई किती वाजता केली त्यासाठी किती वेळ लागला हे फिर्यादीमध्ये नमुद नाही. एस. ए. गायकवाड साहेब हे आमचे वरीष्ठ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरीष्ठांच्या सुचना व आदेश ऐकने आमच्यावर बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, साहेबांच्या सुचनेनुसार मी सदर केसमध्ये फिर्यादी म्हणुन फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या भागामध्ये अवैधरीत्या दारु/ताडी विक्री होत असेल तर साहेबांकडे त्या बाबत तक्रारी येत असतात. तक्रारी आल्यानंतर केसेसे कराव्या लागतात. हे म्हणणे खरे आहे की, ताडी विक्रीबाबत त्या दिवशी कोणतीही तक्रार आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दैनंदिन कामाकाजामध्ये केस करायची म्हणुन सदरची खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने असा कोणताही गुन्हा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. ०४/१०/२०२५**
**घोडेगाव**